**दिनांक १ एप्रिल २००५ ते ३० एप्रिल २००५ या कालावधीत योग्य दराने कर गोळा न केलेल्या व्यापा-यांसाठी प्रशासकीय सवलती बाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक-विकअ-११.०५/प्रक्र.२२२/कराधान-१,**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२, दिनांकः ४ ऑक्टोबर २००५**

**<u>प्रस्तावनाः-</u>**

महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यात सुधारणा करुन तयार करण्यात आलेला "सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-१४" दिनांक १ एप्रिल २००५ पासून अंमलात आला. राष्ट्रीय मतैक्यानुसार या अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची "क" आणि "ग" मध्ये काही सुधारणा करुन, सदर सुधारित अनुसूची दिनांक १ मे २००५ पासून अंमलात आली.

अनुसूची "क" शुन्य कर दर असलेल्या वस्तुंकरिता आहे आणि अनुसूची "ग" ४ टक्के कर दर असलेल्या वस्तुंकरिता आहे. या अनुसुचींच्या सुधारणेमुळे शून्य टक्के व ४ टक्के कराचा दर आहे, अशा मालाच्या सूचींमध्ये काही वस्तू दिनांक १ मे २००५ पासून नव्याने दाखल करण्यात आल्या तर काही वगळण्यात आल्या आहेत. लागू असलेले कराचे दर, दिनांक १ मे २००५ पासून ज्या वस्तूंवर कमी करण्यात आलेले आहेत, त्या अनुसूची "क" आणि "ग" मधील वस्तूंचा तपशील या शासन निर्णयाच्या जोडपत्रामध्ये देण्यात आलेले आहे.

मुल्यवर्धित कर अधिनियमातील अनुसूची मध्ये दिनांक १ मे २००५ मध्ये सुधारणा करण्यात आल्यामुळे, मधल्या एका महिन्याच्या कालावधीमध्ये ब-याच उत्पादकांनी आणि व्यापा-यांनी खरेदीदारांकडून योग्य दराने कर गोळा केलेला नाही. सदर बाब लक्षात घेऊन ज्या व्यापा-यांनी १ एप्रिल २००५ ते ३० एप्रिल २००५ या कालावधीमध्ये जोडपत्रामध्ये दिलेल्या तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालावर योग्य त्या दराने कर गोळा केलेला नाही अशा व्यापा-यांसाठी प्रशासकीय सवलत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. आता शासन खालीलप्रमाणे प्रशासकीय सवलत मंजूर करण्याचा निर्णय घेत आहेः-

**<u>शासन निर्णय</u>**

ज्या वस्तूंवरील कराचा दर ४ टक्के किंवा १२.५ टक्के होता. अशा वस्तूंपैकी ज्या वस्तूंवर दिनांक १ मे २००५ पासून लागू असलेला कराचा दर कमी होऊन तो शुन्य टक्के किंवा ४ टक्के झाला आहे अशा वस्तूंचे बाबतीत, त्या वस्तुंच्या दिनांक १ एप्रिल २००५ ते ३० एप्रिल २००५ या कालावधीतील विक्रीसाठी संबंधित व्यापा-यांना खाली नमूद करण्यात आलेल्या अटींचे आधीन राहून प्रशासकीय सवलत देण्यात येईल,

(अ) संबंधित व्यापा-याने त्या कालावधीचे विवरणपत्र सादर केले असेल तर हया कालावधीतील कायद्याप्रमाणे देय असलेल्या कराचे बाबतीत,-

(१) तो जर वसूल केला नसेल व भरला देखील नसेल तर

(i) जोडपत्र "क" मधील वस्तुंचे बाबतीत देय कराचे प्रमाणात, व

(ii) जोडपत्र "ग" मधील वस्तुंचे बाबतीत, देय कर व विक्रीचे उलाढालीवर ४ टक्के दराने येणारी कराची रक्कम हयामधील फरकाचे प्रमाणात

(२) तो जर अंशतः वसुल केला असेल व वसुल केलेल्या कराचा पूर्ण भरणा केला असेल तर

(i) जोडपत्र "क" मधील वस्तुंचे बाबतीत देयकर वजा भरलेला कर त्या प्रमाणात, व

(ii) जोडपत्र "ग" मधील वस्तुंचे बाबतीत, (देय कर वजा भरलेला कर) अथवा (देय कर वजा विक्रीचे उलाढालीवर ४ टक्के दराने येणारा कर ) हयामधील जी रक्कम कमी असेल त्या रकमेच्या प्रमाणात,

(३) तो जर अंशतः वसुल केला असेल व वसुल केलेल्या कराचा पूर्ण भरणा केला नसेल तर असा न भरलेला कर एक महिन्याचे आत भरणे बंधनकारक असेल व अशा प्रकरणात प्रशासकीय सवलतीची गणना (२) प्रमाणे होईल,

(४) तो जर वसूल केला नसेल परंतु निव्वळ कराचा भरणा केला असेल तर (२) प्रमाणे गणना होईल. भरलेल्या कराचे बाबतीत कायदेशीर तरतूदीनुसार व्याज आकारले जाईल. प्रशासकिय सवलत हया शासन निर्णयाचे अनुषंगाने देण्यात येईल.

**अटी** :- (१) वरील कालावधीकरिता व्यापा-याने विवरणपत्रामध्ये विक्रीचे उलाढाली मधून कराचे प्रमाण कमी करुन दाखविले असेल तर तो कर गोळा केला आहे असा निष्कर्श काढण्यात येईल.

(२) जोडपत्र "ग" मधील वस्तुंचे बाबतीत विक्रीचे उलाढालीवर ४ टक्के दराने कराची रक्कम शासन निर्णयाचे दिनांकापासून एक महिन्याचे आत भरणे सवलत मिळविण्याकरिता बंधनकारक असेल. हया भरलेल्या कराचे रकमेवर कायदेशीर तरतुदीनुसार व्याज आकारले जाईल परंतु शास्ती मात्र आकारण्यात येणार नाही.

(३) सदर कालावधीकरिता विवरणपत्र पूर्वी सादर केली नसल्यास या निर्णयाचे तारखांपासून एक महिन्याचे आत, ती सादर करणे बंधनकारक असेल.

(४) प्रशासकीय सवलत मिळालेल्या कराचे रकमेचे अनुषंगाने देय होणा-या व्याजाची रक्कम सवलतीस पात्र असेल.

(ब) शासनाने दिलेल्या, प्रशासकीय सवलतीमुळे कुठल्याही परिस्थितीत कोणताही परतावा दिला जाणार नाही.

**<u>प्रशासकीय सवलत मंजूर करणारी यंत्रणाः</u>**

या शासन निर्णयानुसार प्रशासकीय सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत असून आवश्यकतेनुसार सदर अधिकार आयुक्तांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील अपर विक्रीकर आयुक्त, सह विक्रीकर आयुक्त, ज्येष्ठ विक्रीकर उपआयुक्त, विक्रीकर उपआयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी यांना प्रदान करण्याची परवानगी विक्रीकर आयुक्तांना देण्यात येत आहे. सदर प्रशासकीय सवलत देताना कायदेशीर बाबींसंबंधी काही अडचणी आल्यास त्याचे निराकरण आयुक्त स्तरावर करण्यात यावे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( शशांक माथने )**
**शासनाचे विशेष कार्य अधिकारी**

प्रतः-

माहितीसाठी व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित.

१) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र, मुंबई.
४)विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, विक्रीकर भवन, ८वा मजला,माझगांव, मुंबई-४०००१०. (२० प्रती).
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परीक्षक, मुंबई.
७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) निवड नस्ती, कराधान-१.